13. जे लिलावधारक ठरवून दिलेल्या मुदतीत बयाना रक्कम (EMD) व लिलाव शुल्क (Auction Fees) याचा मुळ धनाकर्ष सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,नाशिक यांच्या कार्यालयात जमा करणार नाहीत त्यांना अपात्र समजण्यात येईल.
14. ई-लिलावात सादर केलेले दर 90 दिवसांकरिता वैध ठेवणे बंधनकारक आहे.
15. संकेतस्थळावर अपलोड केलेल्या कागदपत्रांपैकी काही मूळ कागदपत्रांची मागणी केल्यास ते तात्काळ सादर करणे बंधनकारक राहिल.
16. ई-लिलाव प्रक्रियेतील दर स्वीकारणे अथवा नाकारणे या बाबत चे सर्व अधिकार समितीने राखून ठेवले आहेत. त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
17. ई-लिलाव प्रकियेतील प्राप्त कमाल दर संकेतस्थळावर उपलब्ध नाहीत.
18. लिलावदाराने सादर केलेले दर हे त्या वस्तुच्या विक्रीच्या किमंतीपेक्षा कमी असल्यास ते दर नामंजूर करण्यात येतील. ज्या लिलावदाराचे दर सर्वात जास्त असतील त्यांचे दर त्या लॉटसाठी अंतिमत: मान्य करण्यात येतील. ज्या लिलावदारांचे दर मंजुर होतील त्यांनी दर स्विकारले असल्याचे (A.O.C) पत्र मिळाल्यापासून पुढील 10 कामकाजांच्या दिवसांत बोली रकमेच्या 100% रक्कम भरणा धनाकर्ष (DD) स्वरुपात तसेच GST भरल्याचे चलनाची प्रत सहसंचालक कार्यालयात वेळेत जमा करणे बंधनकारक राहिल.सदर रक्कम विहीत कालावधीत न भरल्यास लिलावदाराची बयाना रक्कम जप्त करुन आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.
19. सादर केलेले दर हे निरुपयोगी साहित्याच्या विक्रीचे मूल्य असेल. निरुपयोगी साहित्याच्या विक्री मुळे/साहित्यांच्या हस्तांतरणामुळे लागू होणा-या अतिरिक्त करांचा शासन भरणा लिलावदारास करणे बंधनकारक राहिल.
20. **यशस्वी लिलावदारांना बोलीनुसार विक्रीच्या किंमतीवरील GST व इतर आवश्यक त्या कराचा शासन भरणा लिलावानंतर लिलावदाराने स्वतंत्रपणे भरणे बंधनकारक राहिल, याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहिल तसेच आयकर कायदयामधील तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.**
21. ज्या लिलावदाराचे त्या-त्या लॉटसाठी दर मंजुर होतील त्यांनी त्या लॉटसाठी मंजुर झालेल्या दराची सर्व रक्कम भरल्याशिवाय संबंधित संस्थेतुन साहित्य नेता येणार नाही.सदर रक्कम भरल्यानंतर संबंधित लिलावदाराने निर्लेखन विक्री आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत साहित्याचा ताबा घ्यावा अन्यथा त्यापुढील प्रत्येक दिवसासाठी रु.100/- दंड व रु.10/- पार्किंग चार्जेस याप्रमाणे रक्कम आकारण्यात येईल. सदरचा कालावधी हा फक्त पुढील 30 दिवसांचा असेल त्यानंतर कोणतीही माहिती न देता भरलेली बयाना रक्कम जप्त करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. या बाबतचे सर्व अधिकार सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय,नाशिक यांचे राहतील.
22. लिलाव धारकाला एक किंवा जास्त लॉट मंजुर झाले असतील व नंतर त्यांनी काही लॉट खरेदी करण्यास नकार दिल्यास अशा वेळी त्याला मंजुर झालेल्या लॉटपैकी जो लॉट खरेदी करावयाचा आहे त्याची 100% रक्कम भरणा करुन घेवून ते साहित्य त्यास देण्यात येईल. परंतु त्याला मंजुर झालेल्या इतर लॉटमधील साहित्य खरेदी करण्यास नकार दिल्यामुळे बोली प्रक्रियेतील त्याची सर्व लॉटची बयाना रक्कमEMD जप्त केली जाईल.

23)ज्या लिलाव धारकास योग्य बोलीनुसार एच 1 प्रमाणे लॉट प्राप्त होईल त्या लिलाव धारकांची EMD हि सिक्युरीटी डिपॉझीट म्हणुन वर्ग होईल तसेच एच 1 व लॉट नुसार निर्धारीत लॉटचे मुल्य व जीएसटी रकमेचे चलन वेगळे भरणे बंधनकारक राहील.

24) तसेच एच 1 लिलाव धारकास निर्लेखन विक्रीची कार्यवाही पुर्ण होई पावेतो EMD / सिक्युरीटी डिपॉझीटची रक्कम परत दिली जाणार नाही यांची प्रकर्षाने नोंद घ्यावी.

25) बोली प्रक्रियेतील साहित्याचा ताबा देण्याची प्रक्रिया ही संबंधित संस्था/केंद्र करेल. कोणतेही साहित्य संस्थेतुन नेतांना संस्थेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची वसुली संबधित लिलावदाराकडून करण्यात येईल.

26) लिलावदारास कोणत्याही प्रकारचे कर उदा.जकात कर व इतर कर या बाबत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही .

27) सदरहू लिलाव प्रक्रिया फक्त व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,नाशिक कार्यक्षेत्रापुरती मर्यादित आहे. त्यामुळे सदर लिलावाच्या संबंधी न्यायप्रविष्ठ प्रकरणे फक्त नाशिक न्यायालयाच्या कक्षेत राहतील.

28) एखादे साहित्य लिलावात असूनही विक्री करावयाची किंवा नाही अथवा संपुर्ण लिलाव प्रक्रिया रदद करण्याबाबतचे सर्व अधिकार सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,नाशिक यांनी राखुन ठेवले आहे.

29) **तसेच याबाबत काही शंका असल्यास खालील मदत क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा. श्री.वाय.एम.पाटील (सहाय्यक संचालक) -मो.क्रमांक 9850949366, व श्री.डी.जी. शिसोदे (स.प्र.स.) - मो. क्रमांक 9823194545**

**सहसंचालक**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण**
**प्रादेशिक कार्यालय,नाशिक .**

# Section -6

# ANEXTURE - 1

## ई—लिलाव संकेतस्थळावर अपलोड करावयाच्या लिलावदारासाठीचा माहितीचा नमुना

| अ.क्र. | आवश्यक माहिती | तपशिल |
|---|---|---|
| 1 | लिलावदाराचे नांव | |
| 2 | पत्ता | |
| 3 | फर्म/स्थापनेचा दिनांक | |
| 4 | लिलावदाराचा/फर्मच्या व्यापाराचे स्वरुप | |
| 5 | Pancardक्रमांक | |
| 6 | GST क्रमांक | |
| 7 | लिलावदाराचा ई मेल | |
| 8 | लिलावदाराचा कार्यालयाचा पत्ता | |
| 9 | लिलावदाराच्या बँकेचे नांव | |
| 10 | लिलावदाराचे बँक खाते क्रमांक | |
| 11 | लिलावदाराचे बँकेचे IFSC कोड | |
| 12 | लिलावदाराचे अधिकृत प्रतिनिधीचे पदनाम | |
| 13 | लिलावदाराचे अधिकृत प्रतिनिधीचे नांव | |
| 14 | लिलावदाराचा मोबाईल क्रमांक | |

# Section -7

## ANEXTURE - 2

## ई—लिलाव संकेतस्थळावर अपलोड करावयाच्या लिलावदारासाठीचा स्वघोषणा पत्राचा नमुना

## स्वघोषणा पत्र

मी घोषणा करतो की, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,नाशिक विभागातील निरुपयोगी, विनावापर यंत्रसामुग्री व उपकरणे ई-लिलावाच्या अटी व शर्ती मला समजल्या असून, त्या मला मान्य आहेत.

सदर ई-लिलाव प्रक्रियेतील सर्व निरुपयोगी,विनावापर यंत्रसामुग्री व उपकरणे मी प्रत्यक्ष पाहिले असून सदरच्या वस्तुबाबत सद्यस्थिती बाबत/संख्येबाबत मी समाधानी आहे. या बाबत कोणतीही तक्रार/शंका नाही.

सदरच्या ई-लिलाव प्रक्रियेस मी पात्र झाल्यानंतर ही ऑर्डर मला मिळाल्यास हे सर्व साहित्य मी स्वखर्चाने संबंधित संस्थेतुन घेऊन जाईल.

सदर ई- लिलाव प्रक्रिये संबंधित सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे.

मी या ठिकाणी घोषणा करतो की, मी सादर केलेले बिड सर्व प्रकारे विनशर्त आहे.

लिलावदाराची सही

ठिकाण -

लिलावदाराचे नांव

फर्मचा शिक्का

# Section -8

## <u>महत्वाचे कागदपत्रे सोबत जोडयात येत आहे त्याचा तपशिल पुढील प्रमाणे</u>

1) साहित्याच्या नावाची यादी
2) लॉटनिहाय यादी XLS स्वरुपात